## आजचे पंचांग

दिनांक : १३ सप्टेंबर २०२६ वार : रविवार माह (अमावस्यांत) : भाद्रपद माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : द्वितीया तिथी (सकाळी ०७:०८ पर्यंत) त्यानंतर तृतीया तिथी नक्षत्र : हस्त नक्षत्र (दुपारी ०१:०६ पर्यंत) त्यानंतर चित्रा नक्षत्र योग : शुक्ल योग (दुपारी ०१:४२ पर्यंत) त्यानंतर ब्रह्म योग करण : कौलव करण (सकाळी ०७:०८ पर्यंत) त्यानंतर तैतुला करण चंद्र राशी : कन्या राशी (१४ सप्टेंबर रात्री ०१:२६ पर्यंत)

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


### मनोज जरांगेंचा मुंबईकडील मोर्चा अडवण्यास कोर्टाचा नकार

**पुणे :** मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईकडे कूट करण्याचे ठरवले आहे. आज आंतरवली सराटीमध्ये बैठक होणार आहे. त्यानंतर मुंबईकडे जाण्याचे नियोजन होणार आहे. शुक्रवारी जरांगे पाटील यांच्या मोर्चाला मुंबईत येण्यापासून रोखण्यासाठी याचिका करण्यात आली होती. मात्र, ते आल्याने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असा अंदाज वर्तवत त्यावर बंदी घालणे योग्य नाही, असे म्हणत जरांगे पाटील यांच्या मोर्चाला आडवण्यास आदेश देण्यास कोर्टाने नकार दिला. कोर्टाच्या भूमिकेनंतर राज्य सरकारची भूमिका महत्वाची ठरणार आहे. मात्र, कोर्टात राज्य सरकारकडून महाधिकवक्ता मिलिंद साठे यांनी बाजू मांडताना गणेशोत्सव सुरू होत आहे त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने जरांगेंना आंदोलनाची परवानगी दिली नसल्याचे सांगितले. परवनागीशिवाय मोर्चा काढता येणार नसल्याचे देखील ते म्हणाले.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ | वर्ष - १ अंक - ३४६ पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### ४८२ कोटींचा दिलासा : योगायोग की सत्तेच्या दारातील हितसंबंध?

#### अदानींची मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर खाणदंड रद्द; कर्नाटक सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

बंगळुरू : प्रतिनिधी

अदानी समूहाशी संबंधित अउउ कंपनीला कर्नाटक उच्च न्यायालयाने तब्बल ४८२.६९ कोटी रुपयांच्या खाणदंडातून दिलासा दिला आहे. कलाबुरगीतील चुनखडी उत्खनन प्रकरणात राज्य सरकारची दंडात्मक मागणी न्यायालयाने रद्द केली. खाणपट्टा ३१ मार्च २०३० पर्यंत वैध असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

हा निर्णय न्यायालयाचा आहे, हे निर्विवाद. त्यामुळे त्याचे श्रेय किंवा दोष थेट सरकारला देता येणार नाही. पण प्रश्न न्यायालयीन निकालापेक्षा सत्तेच्या दारातील संभाव्य हितसंबंधांचा आहे.

अदानी समूहाच्या प्रमुखांची अलीकडेच कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी भेट झाल्याच्या पार्श्वभूमीवर एवढा मोठा आर्थिक दिलासा मिळाल्याने योगायोग की सत्तेच्या जवळिकीचे राजकीय अर्थ? हा प्रश्न विचारला जाणे स्वाभाविक आहे.

४८२ कोटींची रक्कम ही सामान्य प्रशासनिक आकडेवारी नाही. राज्याच्या महसुलाशी संबंधित एवढ्या मोठ्या दाव्याला न्यायालयीन प्रक्रियेत धक्का बसला, तर सरकारने स्वतःची भूमिका किती ठोसपणे मांडली होती, याचीही तपासणी होणे आवश्यक आहे.

भेटी आणि न्यायालयीन निकाल यांच्यात संबंध असल्याचा पुरावा आहे का? नाही. मग पारदर्शकतेचा प्रश्न संपतो का? तोही नाही.

सत्ताधारी आणि मोठे उद्योगसमूह यांच्यातील प्रत्येक भेट संशयास्पद ठरवणे चुकीचे; पण अशा भेटीनंतर कोट्यवधींच्या आर्थिक हिताचा प्रश्न निर्माण झाला तर जनतेला उत्तर मिळणे हा लोकशाहीचा अधिकार आहे. प्रश्न अदानींचा नाही; प्रश्न आहेसरकार आणि उद्योगसमूहांच्या जवळिकीमुळे सामान्य नागरिकाच्या मनात निर्माण होणारा संशय दूर करण्याची जबाबदारी कोणाची?

# लोकशाहीत भिक मागणे गुन्हा, पण गरिबीला जबाबदार कोण?

## भिक्षावृत्तीविरोधी कायद्यावर घटनात्मक प्रश्न; गरिबाला हाकलून लोकशाहीचे चेहरे स्वच्छ होणार का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा अधिकार नव्हे; तर प्रत्येक नागरिकाला मानवी प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार देणारी व्यवस्था. मग या लोकशाहीत पोटाची भूक भागवण्यासाठी रस्त्यावर हात पसरलेल्या माणसाला गुन्हेगाराच्या पिंजऱ्यात उभे करायचे आणि त्याच वेळी त्याला भिकेपर्यंत पोहोचवणाऱ्या सामाजिक-आर्थिक व्यवस्थेला मात्र प्रश्नच विचारायचा नाही, ही कोणती लोकशाही?

'बॉम्बे प्रिव्हेन्शन ऑफ बेगिंग अॅक्ट, १९६०'च्या घटनात्मक वैधतेला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. Centre for Promoting Democracy या संस्थेने दाखल केलेल्या जनहित याचिकेत गरीबी, बेघरपणा आणि हलाखीच्या परिस्थितीत जगणाऱ्या व्यक्तींनाच या कायद्यामुळे गुन्हेगार ठरवले जात असल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.

मुद्दा केवळ 'भिक मागण्याचा' नाही. मुद्दा असा आहे की, एखाद्या नागरिकाला भिक मागण्याची वेळ का आली? बेरोजगारी, महागाई, विस्थापन, अपंगत्व, सामाजिक व आर्थिक वंचितता, कुटुंबाचा आधार तुटणे किंवा निवाऱ्याचा अभावया परिस्थितींना सामोरे जाणाऱ्या व्यक्तीला सरकारने आधार द्यायचा की पोलिसी कारवाई?

रस्त्यावर बसलेल्या भिकाऱ्याला हटवणे सोपे आहे. शहर 'सुंदर' दिसण्यासाठी त्याला नजरेआड करणेही सोपे आहे. पण गरीबी हटवण्याऐवजी गरीब हटवणे हा उपाय लोकशाहीचा कसा असू शकतो?



लोकशाही व्यवस्थेने नागरिकाला रोजगार, अन्न, निवारा, आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा देण्यात अपयश आले, तर त्या अपयशाची शिक्षा पुन्हा त्याच गरीबाला देणे कितपत न्याय्य आहे? ज्याच्या हातात काम नाही, घर नाही, उद्याची खात्री नाही, त्याच्या हातातील भिकेचा कटोरा गुन्ह्याचे हत्यार कसा ठरतो?

कायद्याचा उद्देश सार्वजनिक व्यवस्था राखणे असेल, तर तो उद्देश आणि मानवी प्रतिष्ठेचा घटनात्मक अधिकार यांच्यात संतुलन आवश्यक आहे. भिक्षावृत्तीला गुन्हेगारीच्या चौकटीत ढकलण्याऐवजी पुनर्वसन, निवारा, रोजगार, सामाजिक सुरक्षा आणि मानसिक-शारीरिक आधाराच्या माध्यमातून प्रश्न सोडवणे ही अधिक मानवी भूमिका ठरू शकते.

आज प्रश्न भिकाऱ्याचा नाही; उद्या कोण 'अनावश्यक' ठरेल याचा आहे. गरीब, बेघर आणि वंचित नागरिक सार्वजनिक दृश्यातून हटवून लोकशाही अधिक सुंदर दिसू शकते; पण ती अधिक न्याय्य होईल का?

मुंबई उच्च न्यायालयासमोरचा हा प्रश्न म्हणूनच केवळ एका जुन्या कायद्याच्या वैधतेचा नाही. तो राज्याच्या संवेदनशीलतेचीही परीक्षा आहे. गरीब माणूस लोकशाहीचा नागरिक आहे की शहराच्या सौंदर्याला बाधा आणणारा 'दृश्यदोष'?

लोकशाहीची खरी परीक्षा संसदेतल्या भाषणांत नाही; ती फुटपाथवर हात पसरलेल्या माणसासमोर उभी राहते. त्या वेळी व्यवस्था त्याला गुन्हेगार मानते की नागरिक? हा निर्णयच आपल्या लोकशाहीची खरी ओळख ठरवणार आहे.

## आरटीईच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शाळांवर डिजिटल देखरेख

### चॅरिटेबल ट्रस्टच्या अनुदानित व विनाअनुदानित शाळांसाठी मानक कार्यप्रणाली; मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टद्वारे चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये शिक्षण हक्क कायद्याची (आरटीई) प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी करण्यासाठी आधुनिक डिजिटल देखरेख व मूल्यमापन प्रणाली विकसित करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यातील चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर अनुदानित आणि विनाअनुदानित शाळा चालविल्या जातात. या शाळांमध्ये आरटीई अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांतील पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देणे आवश्यक आहे. मात्र, प्रवेश प्रक्रिया, नियमांची अंमलबजावणी आणि पारदर्शकतेबाबत वारंवार तक्रारी येत असल्याच्या पार्श्वभूमीवर देखरेख यंत्रणा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात उपचार मिळतात की नाही, यावर देखरेख ठेवली जाते. त्याच धर्तीवर चॅरिटेबल ट्रस्टच्या शाळांमध्ये आरटीईची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांना उपलब्ध शैक्षणिक सुविधा आणि शासनाकडून मिळणाऱ्या निधीचा योग्य वापर यावर नियंत्रण ठेवले जाणार आहे. या प्रणालीद्वारे शाळांच्या प्रवेश प्रक्रियेचा नियमित आढावा, शैक्षणिक सुविधांची तपासणी आणि आरटीईच्या तरतुदींच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करणे शक्य होणार आहे. त्यामुळे नियमबाह्य प्रकारांना आळा घालण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. ही प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी विधि व न्याय विभाग तसेच आवश्यक तांत्रिक तज्ज्ञांशी विचारविनिमय करून सर्वसमावेशक प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रस्तावाला आवश्यक आर्थिक मंजुरी मिळाल्यानंतर त्याची तातडीने अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

## एमपीएससीचे काम बंद; पण विद्यार्थ्यांचे भविष्य कोण सांभाळणार?

### सचिवांशी गैरवर्तनाचा निषेध योग्यच; मात्र पेपरफुटीच्या धक्क्यात भरडलेल्या उमेदवारांच्या प्रश्नांचे काय?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सचिव महेंद्र हरपाळकर यांच्याशी झालेल्या कथित गैरवर्तनाच्या निषेधार्थ काम बंद आंदोलन पुकारले आहे. अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निश्चितच गंभीर आहे; मात्र या आंदोलनामुळे सर्वाधिक फटका कोणाला बसणार, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. परीक्षा प्रक्रियेतील गोंधळ, पेपरफुटीचे आरोप आणि प्रशासनाच्या निर्णयांमुळे आधीच अस्वस्थ असलेल्या हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य आता आणखी अनिश्चित होणार नाही ना?

उमेदवारांनी प्रश्न विचारणे, पारदर्शकतेची मागणी करणे आणि गैरप्रकारांविरोधात आवाज उठविणे हा त्यांचा लोकशाही अधिकार आहे. परीक्षा देण्यासाठी वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा, मानसिक ताण आणि वयाची मर्यादा यांचा हिशेब कोण देणार? प्रशासनातील एका घटनेच्या निषेधासाठी कामकाज ठप्प झाले, तर परीक्षा, निकाल, भरती प्रक्रिया आणि पुढील संपूर्ण वेळापत्रकावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

पेपरफुटी किंवा परीक्षेतील गैरप्रकार कोणी केले असतील, तर त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. परंतु दोषी शोधण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची नाही; ती आयोग आणि शासनाची आहे. त्याचप्रमाणे आयोगातील निर्दोष अधिकारी-कर्मचाऱ्यांना लक्ष्य करणेही योग्य नाही. मात्र, प्रशासनाच्या त्रुटींचा भार पुन्हा विद्यार्थ्यांच्याच माथी मारला जाणे याहून मोठा अन्याय कोणता?

आयोगातील अधिकारी सुरक्षित असले पाहिजेत, पण त्याच वेळी परीक्षा देणारा विद्यार्थीही सुरक्षित भविष्याची हमी मागतो. त्याला निष्पक्ष परीक्षा, वेळेवर निकाल, पारदर्शक चौकशी आणि दोषींवर कारवाई हवी आहे.

अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी शासन तत्पर असेल, तर विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या सुरक्षिततेसाठीही तेवढीच तत्परता दाखवणार का?

## सुरक्षित मातृत्व ही कुटुंबाची नव्हे, समाजाची सामूहिक जबाबदारी

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे प्रतिपादन; माता मृत्यू रोखण्यासाठी जनजागृतीवर भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

गरोदरपणापासून बाळंतपणापर्यंत महिलांना सुरक्षित आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क असून, सुरक्षित मातृत्व ही केवळ एका कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले.

मातृत्वाच्या काळातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासोबतच माता मृत्यूच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी व्यापक जनजागृतीची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महिलांच्या आरोग्याच्या प्रश्नांकडे केवळ वैद्यकीय नव्हे, तर सामाजिक जबाबदारी म्हणून पाहणे आवश्यक आहे.

गरोदर महिला आणि मातांना वेळेवर तपासणी, योग्य उपचार, सुरक्षित प्रसूती सुविधा तसेच आवश्यक आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. यासाठी कुटुंब, आरोग्य यंत्रणा, स्थानिक संस्था आणि समाजातील प्रत्येक घटकाने संवेदनशीलतेने योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले.

माता आणि बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने राज्य सरकारकडून विविध आरोग्य योजना राबविण्यात येत असून, या योजनांचा लाभ गरजू महिलांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यावर भर दिला जात आहे. सुरक्षित बाळंतपण आणि मातांच्या आरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी शासनासोबतच समाजानेही सक्रिय भूमिका बजावणे आवश्यक असल्याचे पवार यांनी सांगितले.

गणेशोत्सवात वीजपुरवठा अखंडित ठेवा, तक्रारींची तातडीने दखल घ्या: नाना काटेपिंपरी:गणेशोत्सव काळात अखंडित वीजपुरवठा सुरू ठेवावा, अशी मागणी नाना काटे यांनी केली आहे. महावितरण प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारींची तातडीने दखल घ्यावी, असे आवाहन त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले. सणादरम्यान भाविक आणि गणेश मंडळांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने सतर्क राहावे, असे त्यांनी स्पष्ट केले.महत्त्वाचे मुद्दे:अखंडित पुरवठा: उत्सवाच्या काळात वीज पुरवठा खंडित होऊ नये.तातडीने कारवाई: तांत्रिक बिघाड झाल्यास त्वरित दुरुस्ती पथक पाठवावे.

# अलाहाबादचा निर्णय महाराष्ट्र सरकार मानणार का?

## ३१ मार्च २०१५ पूर्वी टीईटी उत्तीर्ण शिक्षकांना न्यायालयाचा दिलासा; आता राज्य प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष


■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

नियुक्तीच्या वेळी शिक्षक पात्रता परीक्षा (ढएढ) उत्तीर्ण नसली, मात्र कायद्याने दिलेल्या मुदतीत म्हणजेच ३१ मार्च २०१५ पूर्वी टीईटी पात्रता मिळवली असेल, तर केवळ नियुक्तीच्या दिवशी पात्रता नसल्याच्या कारणावरून शिक्षकाची नियुक्ती रद्द करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला आहे.

ठएढ कायद्यातील कलम २३ अंतर्गत शिक्षकांना आवश्यक पात्रता मिळवण्यासाठी दिलेल्या संक्रमणकालीन मुदतीचा अर्थ स्पष्ट करताना न्यायालयाने संबंधित शिक्षकांना दिलासा दिला आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत असलेल्या शिक्षकांच्या सेवेला केवळ नियुक्तीच्या तारखेचा आधार घेऊन प्रश्नांकित करता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

या निर्णयानंतर महाराष्ट्रातील शिक्षण विभागासमोरही महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो राज्य प्रशासन या न्यायालयीन भूमिकेचा व्यापक कायदेशीर परिणाम तपासून समान परिस्थितीतील शिक्षकांना दिलासा देणार का?




महाराष्ट्रात टीईटी पात्रतेशी संबंधित अनेक शिक्षकांच्या सेवा, नियुक्त्या आणि कागदपत्रांची पडताळणी यावरून यापूर्वीही प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय राज्यातील संबंधित प्रकरणांसाठी थेट लागू होतो की नाही, याबाबत महाराष्ट्र सरकारने स्पष्ट कायदेशीर भूमिका मांडणे आवश्यक आहे.

न्यायालयीन निर्णयाचा अक्षरशः परिणाम आणि त्याची कायदेशीर व्याप्ती तपासणे ही प्रशासनाची जबाबदारी असली, तरी एकाच कायद्याच्या तरतुदींचा अर्थ वेगवेगळ्या राज्यांत वेगळा लावला जाणार का? हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. शिक्षकांच्या सेवेशी संबंधित प्रश्न केवळ कागदोपत्री पात्रतेचा नसून त्यांच्या रोजगार, वेतन आणि भवितव्याशी जोडलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने या निर्णयाची सखोल कायदेशीर तपासणी करून समान परिस्थितीतील शिक्षकांना अनिश्चिततेत न ठेवता स्पष्ट आणि पारदर्शक निर्णय घेणे अपेक्षित आहे. आता अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे महाराष्ट्र सरकार कोणत्या दृष्टिकोनातून पाहते, याकडे शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

# न्यायाच्या आसनावर सरकारची सावली?

## न्यायाधीशांच्या निर्णयांपेक्षा त्यांच्या प्रशासकीय हालचाली संशय निर्माण करू लागल्या तर लोकशाहीने कोणाकडे पाहायचे?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

न्यायालय हे लोकशाहीचे शेवटचे संरक्षणकवच मानले जाते. सरकारकडून अन्याय झाला, प्रशासनाने अधिकारांचा गैरवापर केला किंवा एखाद्या नागरिकाचे मूलभूत अधिकार धोक्यात आले, तर नागरिक न्यायालयाकडे धाव घेतो. पण न्याय देणाऱ्या व्यवस्थेवरच सरकारी दबावाची सावली असल्याचा संशय निर्माण झाला तर सामान्य नागरिकाने न्याय मागायचा तरी कुठे?

उत्तर प्रदेशातील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश रवी कुमार दिवाकर यांच्याभोवती निर्माण झालेला वाद या मूलभूत प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्यास भाग पाडतो. एप्रिल ते ऑगस्ट २०२६ या काळात त्यांच्या न्यायालयाने दहा खटल्यांत २२ मृत्युदंडाच्या शिक्षा सुनावल्या. त्यानंतर ७ सप्टेंबरला आणखी एका प्रकरणात मृत्युदंड सुनावण्यात आला. त्याच काळात त्यांच्या न्यायालयातून हत्या आणि गंभीर गुन्ह्यांशी संबंधित १७ प्रलंबित खटले काढून घेण्यात आले. हे दोन्ही प्रकारचे निर्णय स्वतंत्रपणे प्रशासकीय किंवा न्यायालयीन प्रक्रियेचा भाग असू शकतात. मात्र न्यायाधीशांनीच 'भित्रा न्यायाधीश' म्हणून ओळखले जाण्यापेक्षा मृत्यू पत्करणे पसंत करेन, असे तीव्र शब्दांत लिहावे लागते, तेव्हा प्रश्न केवळ एका न्यायालयापुरता राहत नाही. न्यायाधीश हा सरकारचा कर्मचारी असला, तरी न्याय देताना तो सरकारच्या इच्छेचा प्रतिनिधी नसतो. त्याची निष्ठा संविधानाशी असते. हीच न्यायव्यवस्थेच्या स्वायत्ततेची मूलभूत संकल्पना आहे. मग एखाद्या न्यायाधीशाच्या न्यायालयातून गंभीर स्वरूपाचे तब्बल १७ खटले काढून घेण्याचा निर्णय झाला, तर त्यामागची कारणे सार्वजनिक आणि पारदर्शकपणे स्पष्ट केली जातील का?

आणखी गंभीर प्रश्न म्हणजे न्यायाधीशांच्या सार्वजनिक वक्तव्यांचा सत्ताधाऱ्यांशी असलेला सूर. मुख्यमंत्र्यांचे कौतुक करणाऱ्या न्यायाधीशाच्या वक्तव्यांपासून ते मोठ्या संख्येने मृत्युदंडाच्या शिक्षांपर्यंतचा प्रवास पाहताना न्यायालयीन स्वायत्ततेबद्दल प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. याचा अर्थ प्रत्येक कठोर शिक्षा सरकारच्या दबावामुळेच झाली, असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल. पण न्यायव्यवस्थेवर संशयाची छाया निर्माण करणाऱ्या परिस्थितीचे स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी व्यवस्थेची नक्कीच आहे.

सरकार बदलते; सत्ता बदलते; पण न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा कायम राहिली पाहिजे. जर न्यायाधीशांना प्रशासकीय निर्णयांमुळे स्वतःच्या स्वातंत्र्याबद्दल असुरक्षित वाटत असेल, तर तो न्यायपालिकेच्या आरोग्यासाठी गंभीर इशारा आहे. आणि जर अशा भावना चुकीच्या असतील, तर त्यांचे निरसन करण्यासाठी पारदर्शकता का दाखवली जाऊ नये? मृत्युदंड ही स्वतःच अत्यंत गंभीर शिक्षा आहे. अशा शिक्षांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असेल, तर प्रत्येक प्रकरणात 'दुर्मिळातील दुर्मिळ' या घटनात्मक कसोटीचा कठोरपणे विचार झाला आहे का, हा प्रश्न विचारणेही आवश्यक आहे. न्यायालयाला सरकारपासून स्वतंत्र राहण्याची गरज आहे, कारण सरकारवर नियंत्रण ठेवण्यासाठीच न्यायालय असते; सरकारचे समर्थन करण्यासाठी नव्हे. आज प्रश्न रवी कुमार दिवाकर यांच्यापुरता नाही. प्रश्न आहे त्या प्रत्येक न्यायाधीशाचा, जो संविधानाची शपथ घेऊन न्यायासनावर बसतो. त्याच्या निर्णयावर सरकारची नाराजी, प्रशासकीय कारवाई किंवा पदाच्या भवितव्याची भीती प्रभाव टाकू लागली, तर न्यायालयाचा दरवाजा उघडा असला तरी न्याय खरोखर स्वतंत्र आहे का? लोकशाहीत सत्तेला प्रश्न विचारणारी पत्रकारिता आवश्यक आहे; पण त्याहून अधिक आवश्यक आहे सत्तेला घाबरत नाही अशी न्यायव्यवस्था. कारण न्यायालयाच्या भिंतींवर सरकारची सावली पडली, तर सर्वांत आधी अंधारात जातो तो सामान्य नागरिकाचा न्यायाचा विश्वास.

## संपादकीय

### दारूबंदीचा आदेश की पुणेकरांवर संशय? गणेशोत्सवाच्या नावाखाली प्रशासनाची मनमानी; उच्च न्यायालयाची चपराक

गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडावा, याबाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. पण उत्सवाच्या नावाखाली नागरिकांचे स्वातंत्र्य, व्यवसायाचे अधिकार आणि संपूर्ण जिल्ह्याची प्रतिमा यांना गृहित धरून निर्णय घेण्याचा अधिकार प्रशासनाला कोणी दिला? पुण्यात गणेशोत्सवाच्या काळात मद्यविक्रीवर सरसकट बंदी घालण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयाने घेतलेली कठोर भूमिका हा याच प्रश्नाचा नेमका वेध घेणारा धडा आहे. अधिकार हातात आहेत म्हणून ते विवेकशून्यपणे वापरण्याची मुभा प्रशासनाला नाही, हे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

पुणे हा केवळ महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखला जाणारा जिल्हा नाही; सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा रुजविणारे हे शहर आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचे काम केले. आज याच उत्सवासाठी देश-विदेशातून भाविक पुण्यात येतात. अशा शहरात उत्सवाच्या काळात कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाने कठोर उपाययोजना कराव्यात, त्याचे स्वागतच केले पाहिजे. मात्र कायदा-सुव्यवस्था राखण्याचा मार्ग म्हणून संपूर्ण जिल्ह्यात दहा दिवस मद्यविक्री बंद करण्याचे तर्कशास्त्र कितपत योग्य आहे?

याच प्रश्नावर उच्च न्यायालयाने प्रशासनाला धारेवर धरले. राज्यभरात अनेक सण-उत्सव सुरू असताना दारूबंदीसाठी केवळ पुण्याचीच निवड का करण्यात आली, असा न्यायालयाचा सवाल आहे. हा प्रश्न साधा असला तरी त्याचे उत्तर प्रशासनासाठी अवघड आहे. कारण पुणे वेगळे का? पुणेकर वेगळे का? आणि पुण्यातील नागरिकांवरच असा विशेष संशय का?

जर मद्यविक्रीमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे असेल, तर त्यासाठी ठोस आकडेवारी, पूर्वानुभव, गुन्हेगारीचे विश्लेषण किंवा विशिष्ट परिस्थितीचा आधार असणे अपेक्षित आहे. केवळ 'दारू प्यायल्याने गोंधळ होऊ शकतो' या गृहितकावर संपूर्ण जिल्ह्याला शिक्षा देता येणार नाही. प्रशासनाने शक्यता आणि पुरावा यातील फरक समजून घेणे गरजेचे आहे.

सर्वांत गंभीर बाब म्हणजे अशा निर्णयातून पुणेकरांच्या सामाजिक प्रतिमेलाच एकप्रकारे धक्का बसतो. गणेशोत्सव आला की पुण्यात कायदा-सुव्यवस्था बिघडते, मद्यविक्री झाली की गुन्हे वाढतात आणि त्यामुळे सर्व नागरिकांवर सामूहिक निर्बंध लादणे आवश्यक आहे, असा संदेश यातून जातो. हा केवळ प्रशासकीय निर्णय राहत नाही; तो संपूर्ण समाजाकडे संशयाने पाहण्याचा दृष्टिकोन ठरतो.

प्रशासनाला प्रतिबंधात्मक कारवाईचे अधिकार आहेत. परवानाधारक मद्यविक्री केंद्रांवर नियमांची कठोर अंमलबजावणी करता येते. संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त पोलिस बंदोबस्त करता येतो. नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करता येते. मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवर कठोर दंड करता येतो. मग दोष करणाऱ्या व्यक्तीऐवजी संपूर्ण जिल्ह्यालाच दोषी ठरविण्याची घाई कशासाठी?

हा प्रश्न केवळ दारूविक्री करणाऱ्या व्यावसायिकांच्या हिताचा नाही. प्रश्न आहे तो प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा. आज दारूच्या नावाखाली संपूर्ण जिल्ह्यावर निर्बंध; उद्या कोणत्या कारणाने कोणत्या नागरिकाच्या अधिकारावर मर्यादा आणली जाईल, याची शाश्वती काय? लोकशाहीत प्रशासनाचे काम नागरिकांचे जीवन अधिक सुरक्षित आणि सुव्यवस्थित करणे आहे; नागरिकांना आपल्या निर्णयांच्या चौकटीत जबरदस्तीने बसविणे नव्हे.

विशेषतः व्यवसायाच्या अधिकारावर परिणाम करणारा आदेश काढताना प्रशासनाने अधिक जबाबदारीने वागणे अपेक्षित आहे. अनेक व्यावसायिक, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबांचे आर्थिक हित अशा निर्णयाशी जोडलेले असते. त्यामुळे एखादा निर्बंध आवश्यक असेल तर त्यामागे स्पष्ट, तर्कसंगत आणि न्याय्य कारण असले पाहिजे. 'आम्हाला अधिकार आहे' हे कारण स्वतःमध्ये पुरेसे कारण नाही.

उच्च न्यायालयाची भूमिका त्यामुळे प्रशासनासाठी आरसा आहे. हा आरसा केवळ पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी पाहण्याची गरज नाही; राज्यातील प्रत्येक अधिकाऱ्याने पाहण्याची गरज आहे. कारण लोकशाहीमध्ये कायदे आणि अधिकार यांच्याबरोबर विवेक, समानता आणि नागरिकांच्या स्वातंत्र्याचा आदर हीसुद्धा प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे.

गणेशोत्सव हा भक्तीचा आणि सामाजिक एकात्मतेचा उत्सव आहे. तो शांततेत पार पडायलाच हवा. पण शांतता प्रस्थापित करण्यासाठी संपूर्ण समाजावर संशय घेण्याची गरज नाही. काहींच्या संभाव्य गैरवर्तनासाठी सर्वांना दोषी ठरविणे हा प्रशासनाचा सोपा मार्ग असू शकतो; मात्र तो लोकशाहीचा मार्ग नाही.

पुणेकरांना उत्सव साजरा करण्यासाठी प्रशासनाच्या परवानगीची नव्हे, तर सुरक्षित आणि न्याय्य वातावरणाची गरज आहे. प्रशासनाने नागरिकांवर विश्वास ठेवावा आणि नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करावी. कारण लोकशाहीचा अर्थ नागरिकांवर नियंत्रण ठेवणे नाही; तर नागरिकांचे अधिकार जपून व्यवस्था चालविणे हा आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या चपराकीतून प्रशासनाने एवढे तरी शिकावे निर्बंध लावण्यापूर्वी कारण तपासा, आदेश काढण्यापूर्वी त्याची गरज सिद्ध करा आणि अधिकार वापरताना नागरिकांना संशयितांच्या पिंजऱ्यात उभे करू नका. गणेशोत्सवाच्या नावाखाली पुणेकरांवर संशय घेण्याची गरज नाही; प्रशासनाने आपल्या निर्णयक्षमतेवरच संशय घेण्याची वेळ येऊ देऊ नये.

# गणेशोत्सवात जड-अवजड वाहनांना ६० मार्गांवर प्रवेशबंदी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

गणेशोत्सवातील विसर्जन मिरवणुका, नागरिकांची गर्दी आणि वाहतूक कोंडी लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेने शहरातील विविध भागांमध्ये जड-अवजड वाहनांना तात्पुरती प्रवेशबंदी केली आहे. पोलीस उपआयुक्त वाहतूक विक्रांत देशमुख यांनी याबाबत अधिसूचना जारी केली आहे.

ही प्रवेशबंदी १४, १९, २०, २४ आणि २५ सप्टेंबर २०२६ रोजी पूर्णवेळ लागू राहणार आहे. उर्वरित दिवसांमध्ये सायंकाळी ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत जड-अवजड वाहनांना प्रवेशबंदी असेल. अत्यावश्यक सेवेतील वाहनांना या निर्बंधातून वगळण्यात आले आहे.

भोसरी वाहतूक विभागात दिघी रोड-गंगोत्री पार्क ते संविधान चौक, बनाचा ओढा ते माई वडेवाले, जायका टी जंक्शन-गायत्री मैदान-भाजी मंडई, लांडेवाडी चौक ते चांदणी चौक या मार्गांवर बंदी आहे.

निगडी विभागात चिंचवड स्टेशन-लोकमान्य हॉस्पिटल-चाफेकर चौक-जुना जकात नाका-थेरगाव घाट, कालिकामाता मंदिर-लिंक रोड-एलप्रो मॉल-चाफेकर चौक, विठ्ठल मंदिर-पॉवर हाऊस चौक-चाफेकर चौक-मोरया घाट तसेच टिळक चौक-गणेश तलाव-संभाजी चौक-विठ्ठल मंदिर परिसरात निर्बंध आहेत.

पिंपरी विभागात लिंक रोड-भाटनगर, शगुन चौक-साई चौक-आर्य समाज चौक-कराची चौक-रिव्हर रोड-काळेवाडी पूल, साई चौक-गेलार्ड चौक-शास्त्री गार्डन-नव महाराष्ट्र विद्यालय, पवनेश्वर मंदिर-काळेवाडी पूल, जाधव वडेवाले चौक-रहाटणी पूल, पिंपरी चौक-पिंपरी पूल, मोरवाडी चौक-पिंपरी पूल, डिलक्स चौक-पिंपरी गाव, वल्लभनगर अंडरपास-संत तुकारामनगर-नेहरूनगर, नेहरूनगर-तब्बकल मशीद, संतोषीमाता चौक-आंबेडकर चौक, आंबेडकर चौक-मोरवाडी, मोरवाडी-सम्राट चौक, सम्राट चौक-झिरो बॉईज चौक, केएसबी चौक-बसवेश्वर चौक-महावीर चौक तसेच मोहननगर-काळभोरनगर भागात बंदी आहे.

बावधन, वाकड, सांगवी, हिंजवडी, देहूरोड, चिखली आणि दिघी-आळंदी वाहतूक विभागातील विविध प्रमुख मार्गांवरही जड-अवजड वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. विशेषतः चिखली विभागातील देहू-आळंदी रोड, मोशी चौक-वाय पॉइंट, कृष्णानगर-चिखली चौक, नेवाळे वस्ती-पिंगळे चौक, कुदळवाडी सर्कल-डायमंड चौक आदी मार्गांचा समावेश आहे.

दिघी-आळंदी विभागात आळंदी फाटा-आळंदी, चिंबळी फाटा-आळंदी, शेलपिंपळगाव-वडगाव घेनंद-आळंदी, धानोरे फाटा-आळंदी आणि विश्रांतवाडी रोड-देहूफाटा-आळंदी या मार्गांवरही बंदी आहे.

वाहनचालकांनी बंद मार्ग टाळून उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. अधिसूचनेत प्रत्येक बंद मार्गासाठी स्वतंत्र पर्यायी मार्ग नमूद करण्यात आलेला नाही. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी संबंधित विभागांनी बॅरिकेडिंग व दिशादर्शक फलक लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# कंपनीच्या बँक खात्यातून ५.६७ कोटींचा अपहार..!

## पासवर्डचा गैरवापर करून रक्कम स्वतःच्या खात्यावर वळविल्याचा आरोप

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

कंपनीच्या बँक खात्याचा पासवर्ड गैरवापरून तब्बल ५ कोटी ६७ लाख ६ हजार ५९२ रुपयांची रक्कम स्वतःच्या बँक खात्यावर वळवून अपहार केल्याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात अकाउंटंटविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमित दिलीप परदेशी (वय ३८, रा. जुन्नर, पुणे) असे आरोपीचे नाव आहे.

याप्रकरणी विकासक मुकेश कुमार बासिस्ट नारायण साह (वय ४६, रा. द वेस्ट फोर्ड सोसायटी, पिंपळे सौदागर) यांनी वाकड पोलिसांत फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत वेळोवेळी पिंपळे निलख येथील मिलिंद सोसायटी, जगताप डेअरी चौक परिसरातील कार्यालयात हा प्रकार घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे. आरोपी हा फिर्यादी यांच्या कार्यालयात अकाउंटंट म्हणून काम करीत होता.

कंपनीच्या बँक व्यवहारांसाठी फिर्यादी यांनी विश्वासाने आरोपीला पासवर्ड दिला होता. या पासवर्डचा गैरवापर करून आरोपीने कंपनीच्या नावावर असलेल्या बँक खात्यातून एकूण ५ कोटी ६७ लाख ६ हजार ५९२ रुपयांची रक्कम स्वतःच्या नावाच्या बँक खात्यात वळती केल्याचा आरोप आहे. त्यानंतर सदर रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तसेच कंपनीच्या नावावर असलेल्या द फेडरल बँकेच्या बँक स्टेटमेंटमध्ये बनावटपणा करून बनावट बँक दस्तऐवज तयार करण्यात आले. हे स्टेटमेंट खरे असल्याचे भासवून फिर्यादीची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे.

याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहितेतील कलम ३१६ (४), ३१८ (४), ३३६ (२), ३३८ आणि ३४० (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेचे सपोनि सचिन घाटे करीत आहेत.

# विद्यार्थ्यांच्या हातून साकारला पर्यावरणपूरक बाप्पा

## शाडू मातीच्या गणेशमूर्तीतून हरित गणेशोत्सवाचा संदेश

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पिंपरी, दि. १२ सप्टेंबर २०२६ : गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६' आणि 'माझी वसुंधरा ७.०' अभियानांतर्गत 'ग' क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग क्रमांक २३ मधील यशवंतराव चव्हाण विद्यालय, थेरगाव येथे विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली.



या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी शाडू माती आणि नैसर्गिक साहित्याचा वापर करून गणेशमूर्ती साकारल्या. तसेच पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्यापासून सजावट करण्याचे आवाहन करण्यात आले. कागद, कापड, बांबू, पाने आणि नैसर्गिक फुलांचा वापर करण्यास प्रोत्साहन देतानाच थर्माकोल तसेच एकदाच वापरून फेकून देण्यात येणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर महापालिकेचा भर आहे.

उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती आणि उत्साहाचा सण आहे. हा उत्सव साजरा करताना पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही आपली आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती, नैसर्गिक सजावट आणि प्लास्टिकमुक्त उत्सवाचा संदेश घराघरांत पोहोचण्यास मदत होईल. लहान वयातच पर्यावरणपूरक सवयी रुजल्यास त्याचा सकारात्मक परिणाम पुढील पिढीवरही होईल.यावेळी सहायक आरोग्य अधिकारी अतुल सोनवणे, आरोग्य निरीक्षक गोपाल धस, आरोग्य सहाय्यक सचिन उघडे आणि मुख्याध्यापक शिवाजी दौंडकर उपस्थित होते.

# पुनावळेतील प्रशमन शुल्कातील तफावतीप्रकरणी दोन अभियंते निलंबित

## महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची कारवाई; वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही चौकशी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पुनावळे परिसरातील बांधकाम परवानग्यांमध्ये आकारण्यात आलेल्या प्रशमन शुल्काच्या रकमेत तफावत आणि अनियमितता आढळून आल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने दोन अभियंत्यांविरुद्ध निलंबनाची कारवाई केली आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी कार्यकारी अभियंता (स्थापत्य) विजय पुंडलिक सोनवणे आणि उपअभियंता अशोक श्रीरंग मोरे यांना ११ सप्टेंबर रोजी निलंबित केले.

पुनावळे परिसरातील निवासी तसेच वाणिज्य बांधकामांना परवानगी देताना 'प्रपत्र अ' आणि 'प्रपत्र ब'मध्ये आकारण्यात आलेल्या प्रशमन शुल्काच्या रकमेत मोठी तफावत आढळून आली होती. इमारतीच्या विविध मजल्यांची उंची विचारात घेऊन शुल्काची पुनर्गणना करण्यात आल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. मात्र, शुल्काच्या रकमेत नेमकी तफावत कशी निर्माण झाली, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक स्पष्टीकरण मिळाले नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यावर प्राप्त झालेला खुलासा समाधानकारक नसल्याने प्रशासनाने निलंबनाची कारवाई केली आहे.

दरम्यान, या प्रकरणाची व्याप्ती तपासण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शहर अभियंता सुनील भागवाणी आणि कार्यकारी अभियंता विजय सोनवणे यांच्या भूमिकेची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येणार आहे. चौकशीत नेमकी जबाबदारी कोणाची आहे आणि प्रशमन शुल्कातील तफावतीमागील कारणे काय आहेत, हे स्पष्ट होणार आहे.

संबंधित अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३(१) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील संबंधित तरतुदी आणि महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.

निलंबित अधिकाऱ्यांविरुद्ध पुढील १५ दिवसांत दोषारोपपत्र दाखल करून विभागीय चौकशी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या चौकशीत प्रशमन शुल्काच्या आकारणीतील तफावत, त्यामागील प्रशासकीय प्रक्रिया तसेच संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची जबाबदारी तपासली जाणार आहे.

या प्रकरणामुळे महापालिकेच्या बांधकाम परवानगी प्रक्रियेतील शुल्क आकारणी आणि त्यावरील नियंत्रण यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, चौकशीच्या निष्कर्षांकडे आता लक्ष लागले आहे.

# पिरंगुटमध्ये भरधाव हायवा डंपरची ॲक्टिव्हाला जोरदार धडक; आजारी पुतणीला भेटायला निघालेल्या महिलेचा जागीच मृत्यू, पती जखमी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिरंगुट / बावधन : प्रतिनिधी**

आजारी असलेल्या पुतणीची विचारपूस करण्यासाठी पतीसोबत दुचाकीवरून निघालेल्या महिलेला भरधाव हायवा डंपरने पाठीमागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात डंपरच्या धडकेने गंभीर जखमी झालेल्या महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला असून तिचे पती किरकोळ जखमी झाले आहेत. हा अपघात घोटावडे फाट्याकडून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर, पिरंगुट येथील इन्सा मार्टसमोर घडला. याप्रकरणी हायवा चालकाविरोधात बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



संगीता सोपान पारखी असे अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी सोपान बंडू पारखी (वय ६० वर्षे, धंदा- शेती, रा. सद्गुरू कॉलनी नं. १, वाकड, पुणे; मूळ रा. गंगारामवाडी, माण, ता. मुळशी) यांनी बावधन पोलीस ठाण्यात अधिकृत फिर्याद दिली आहे. तर डंपर चालक जालंधर बप्पासाहेब (रा. आकाश काळे यांच्या रूममध्ये, सुतारवाडी, पिरंगुट; मूळ रा. अज्ञात) याच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

नेमकी घटना काय?

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सोपान पारखी यांच्या पत्नी संगीता यांच्या भावाची मुलगी (मुनिता रताळे) आजारी असल्याने तिला पाहण्यासाठी दोघे पती-पत्नी आपल्या ॲक्टिव्हा दुचाकीवरून (क्रमांक: चक १४ चत्र २९४९) माण, घोटावडे, भरे मार्गे पिरंगुटच्या दिशेने जात होते. दुपारी २:०० वाजण्याच्या सुमारास ते पिरंगुट येथील इन्सा मार्टसमोर पोहोचले असता, मागून आलेल्या हायवा डंपरने (क्रमांक: चक १२ तढ १३००) वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करत, निष्काळजीपणे व अविचाराने गाडी चालवून त्यांच्या ॲक्टिव्हाला उजव्या बाजूने जोरदार धडक दिली.

या धडकेत ॲक्टिव्हाचे मोठे नुकसान झाले असून सोपान पारखी किरकोळ जखमी झाले. मात्र, पाठीमागे बसलेल्या संगीता पारखी यांना जबर मार लागल्याने त्या गंभीर जखमी झाल्या आणि उपचारादरम्यान/ घटनेदरम्यान त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या प्रकरणी बावधन पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछ्ड) २०२३ कलम १०६(१), २८१, ३२४(४) सह मोटार वाहन कायदा कलम १८४, ११९/१७७ अन्वये गुन्हा नोंदवला असून पोलीस उपनिरीक्षक ठाकरे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# दुचाकीत पेट्रोल भरण्यासाठी पैसे न दिल्याने आयटी इंजिनिअर पतीने आवळला पत्नीचा गळा; डोक्यात हातोडा मारून संपवण्याचा प्रयत्न!

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**थेरगाव / पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

दुचाकीमध्ये पेट्रोल भरण्यासाठी पत्नीकडे पैसे मागितले, मात्र तिने नकार दिल्याने संतापलेल्या आयटी इंजिनिअर पतीने पत्नीवर अमानुष हल्ला केल्याची धक्कादायक घटना थेरगाव येथे उघडकीस आली आहे. आरोपीने "आज तुझा काटाच काढतो, तुला जिवंत सोडत नाही" अशी धमकी देत पत्नीचा दोन्ही हातांनी गळा दाबून आणि लोखंडी हातोड्याने डोक्यात प्रहार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात पतीविरोधात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमनाथ रावसाहेब एडके (वय ३६, धंदा- आयटी इंजिनिअर, रा. देवगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपी पतीचे नाव आहे. याप्रकरणी त्याची पत्नी शुभांगी सोमनाथ एडके (वय ३०, रा. अशोका सोसायटी, संभाजीनगर, थेरगाव) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास आरोपी सोमनाथ याने फिर्यादी शुभांगी यांच्याकडे दुचाकीत पेट्रोल भरण्यासाठी पैसे मागितले. शुभांगी यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपीचा पारा चढला. त्याने रागाच्या भरात शुभांगी यांचा दोन्ही हातांनी गळा आवळून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. एवढ्यावरच न थांबता आरोपीने "मी आता पाहतोच तू कशी जिवंत राहते" असे म्हणत घरातील लोखंडी हातोड्याने शुभांगी यांच्या डाव्या हाताच्या मनगटावर, दंडावर व कोपरावर जोरात मारहाण करून गंभीर जखमी केले. त्यानंतर आरोपीने थेट डोक्यात हातोडा मारून जीवे संपवण्याचा प्रयत्न केला; मात्र शुभांगी यांनी तो वार हुकवल्याने त्यांचा जीव थोडक्यात वाचला. आरोपीने फिर्यादीसह त्यांच्या नातेवाईकांनाही जीवे मारण्याची धमकी दिली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### ऑक्टोबरमध्ये रेपो दर वाढणार? कर्जदारांची चिंता वाढली!

एसबीआय रिसर्चचा अंदाज; महागाई वाढल्यास ईएमआयचा बोजा वाढण्याची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी

घर, वाहन किंवा शिक्षणासाठी कर्ज घेतलेल्या ग्राहकांसाठी चिंता वाढवणारी शक्यता समोर आली आहे. एसबीआय रिसर्चच्या अहवालानुसार, रिझर्व्ह बँक ऑक्टोबरमध्ये रेपो दरात २५ बेसिस पॉइंट्सची वाढ करू शकते. डिसेंबरमध्येही आणखी २५ बेसिस पॉइंट्स वाढण्याचा अंदाज आहे.

म्हणजेच वर्षअखेरीस रेपो दरात एकूण ५० बेसिस पॉइंट्सची वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मध्यपूर्वेतील तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने महागाईचा दबाव वाढण्याची शक्यता हा त्यामागील प्रमुख घटक मानला जात आहे.

कच्च्या तेलाचा दर १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेल्यास देशांतर्गत महागाईवर परिणाम होऊ शकतो. तेलाच्या किमती अपेक्षेप्रमाणे कमी न झाल्यास ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये महागाई ६.५ टक्के किंवा त्याहून अधिक राहू शकते, असा अंदाज आहे.

रेपो दर वाढल्यास फ्लोटिंग व्याजदराच्या कर्जदारांना थेट फटका बसू शकतो.

ईएमआय वाढणे किंवा कर्जाचा कालावधी लांबणे, असा दुहेरी भार ग्राहकांवर पडण्याची शक्यता आहे.

# कळंबजवळ पुणे-नाशिक महामार्गावर तुटलेले कठडे

## स्मशानभूमी व नदीपात्रालगत धोकादायक स्थिती; मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर । प्रतिनिधी

पुणे-नाशिक महामार्गावरील कळंब गावानजीक स्मशानभूमीशेजारी रस्त्याच्या कडेला असलेले संरक्षक कठडे तुटल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. रस्त्याच्या एका बाजूला स्मशानभूमी, तर दुसऱ्या बाजूला नदीपात्र असल्याने हा मार्ग वाहनचालक व पादचाऱ्यांसाठी धोकादायक बनला आहे. तुटलेल्या लोखंडी बॅरियरऐवजी दोन्ही बाजूंना मजबूत व दर्जेदार सिमेंटचे संरक्षक कठडे उभारावेत, अशी मागणी कळंब ग्रामस्थांनी केली आहे.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी या ठिकाणी दोन ते तीन अपघात झाले. त्यात रस्त्याच्या कडेला असलेले लोखंडी बॅरियरचे कठडे तुटले. सध्या संरक्षक कठडे नसल्याने विशेषतः रात्रीच्या वेळी रस्त्याची कड स्पष्ट न दिसल्यास वाहन नदीपात्राच्या दिशेने जाण्याची अथवा रस्त्याखाली घसरण्याची शक्यता आहे.

पुणे-नाशिक महामार्ग हा या परिसरातील अत्यंत वर्दळीचा मार्ग असून रात्री-अपरात्रीही मोठ्या प्रमाणात वाहनांची वाहतूक सुरू असते. याशिवाय स्थानिक नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शाळकरी मुलांचीही या मार्गावरून ये-जा असते. त्यामुळे तुटलेल्या कठड्यांचा प्रश्न केवळ वाहनांच्या सुरक्षेपुरता मर्यादित नसून पादचाऱ्यांच्या जीवितालाही धोका निर्माण करणारा आहे.

मोठी दुर्घटना घडण्याची प्रतीक्षा कशासाठी?



स्मशानभूमी आणि नदीपात्रालगतचा हा भाग अपघाताच्या दृष्टीने संवेदनशील असतानाही केवळ तात्पुरते लोखंडी बॅरियर लावून प्रश्न सोडविणे पुरेसे ठरणार नाही. मोठी दुर्घटना घडल्यानंतर जागे होण्याऐवजी आताच कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली आहे.

दोन्ही बाजूंना मजबूत आणि टिकाऊ सिमेंटचे संरक्षक कठडे उभारण्याबरोबरच त्यावर रात्री स्पष्ट दिसतील असे रिफ्लेक्टर, दिशादर्शक फलक आणि पुरेशी प्रकाशव्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच राष्ट्रीय महामार्गाशी संबंधित यंत्रणेने या ठिकाणी तातडीने पाहणी करून तुटलेले कठडे दुरुस्त करावेत आणि कायमस्वरूपी सुरक्षा उपाययोजना कराव्यात. जीवितहानी झाल्यानंतर पंचनामा आणि पाहणी करण्यापेक्षा त्याआधीच धोका दूर करावा, अशी मागणी कळंब ग्रामस्थ व पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

### वडगाव काशिंबेग येथे १३ ते २६ सप्टेंबरदरम्यान गणेश फेस्टिवल

## अखंड हरिनाम सप्ताह, बैलगाडा शर्यत, आरोग्य शिबिरासह विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर : प्रतिनिधी

श्री गणेश फेस्टिवलनिमित्त श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग येथे रविवार, दि. १३ ते शनिवार, दि. २६ सप्टेंबरदरम्यान विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अखंड हरिनाम सप्ताह, भव्य बैलगाडा शर्यत, मोफत सर्वरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिर, व्याख्याने आणि महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थान ट्रस्टच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली.

श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थान तीर्थक्षेत्र येथे रविवारी, दि. १३ रोजी महाद्वार यात्रेने गणेश फेस्टिवलला प्रारंभ होणार आहे. सोमवार, दि. १४ रोजी महापूजा व अभिषेक तसेच अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ होईल. मंगळवार, दि. १५ रोजी महिलांचे अथर्वशीर्ष पठण आणि सकाळी १० वाजता 'हास्यनामा' कार्यक्रम होणार आहे.

बुधवार, दि. १६ रोजी डॉ. पूनम दहीतुले यांचे 'किशोरवयीन मुलींची शारीरिक व मानसिक आरोग्याची काळजी' या विषयावर व्याख्यान होईल. गुरुवार, दि. १७ रोजी प्रा. रतीलाल बाबेल यांचे 'गणपती व वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. १८ रोजी श्री गणेश याग हा धार्मिक विधी होणार आहे.

शनिवार, दि. १९ रोजी आंबेगाव तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या सहकार्याने मोफत सर्वरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिर होणार आहे.

दि. २० ते २२ सप्टेंबरदरम्यान भव्य बैलगाडा शर्यत आयोजित करण्यात आली आहे. शर्यतीसाठी एकूण ४ लाख ६२ हजार ३८८ रुपये रोख रक्कम, आठ मोटरसायकली, प्रत्येकी तीन अंगठ्या, फ्रिज, टीव्ही व कुलर अशी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. बैलगाडा शर्यतीसाठी नावनोंदणी मंगळवार, दि. १५ रोजी करण्यात येणार आहे.

बुधवार, दि. २३ रोजी महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम, गुरुवार, दि. २४ रोजी सत्यनारायण महापूजा, तर शनिवार, दि. २६ रोजी काल्याच्या कार्यक्रमाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे.

फेस्टिवलदरम्यान दररोज सकाळी ७, दुपारी ३ आणि सायंकाळी ७ वाजता आरती होणार असून, रात्री ८ वाजता भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या सर्व कार्यक्रमांना भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

## एकतर्फी शुल्क, बळजबरीवर ब्रिक्सचा प्रहार; पहलगाम हल्ल्याचा तीव्र निषेध!


■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / वृत्तसंस्था

'नवी दिल्ली जाहीरनामा'द्वारे ब्रिक्स देशांनी व्यापार विस्कळीत करणाऱ्या आणि जागतिक व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) नियमांशी विसंगत असलेल्या एकतर्फी शुल्क आणि शुल्क-व्यतिरिक्त उपाययोजनांवर गंभीर चिंता व्यक्त केली. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरोधातील एकतर्फी बळजबरीच्या कारवायांचाही निषेध करण्यात आला.

जागतिक संघर्षांवर संवाद, चर्चा आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून शांततापूर्ण तोडगा काढण्याची गरज ब्रिक्सने अधोरेखित केली. संघर्षांची मूळ कारणे दूर करण्यासाठी सक्रिय प्रयत्न, तसेच अणु-संघर्षाचा वाढता धोका रोखण्यावरही भर देण्यात आला.

आर्थिक सहकार्य वाढवताना ब्रिक्स देशांमधील सीमापार देयकांसाठी व्यवहार्य उपाय शोधण्याचे आवाहन करण्यात आले.

दरम्यान, जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. ब्रिक्सच्या अधिकृत निवेदनात सलग दुसऱ्यांदा या हल्ल्याचा उल्लेख झाला आहे. यंदा थेट राष्ट्रप्रमुखांच्या संयुक्त जाहीरनाम्यात त्याचा समावेश झाल्याने दहशतवादाविरोधातील भूमिका पुन्हा अधोरेखित झाली आहे.




## धामणीत खंडोबा मंदिरासमोर अष्टकोनाकृती दीपमाळ

### लोकसहभागातून २१ फूट उंच दगडी दीपमाळीचे बांधकाम सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी : प्रतिनिधी



धामणी (ता. आंबेगाव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत देवस्थानच्या पुरातन खंडोबा मंदिराच्या महाद्वारासमोर लोकसहभागातून उभारण्यात येणाऱ्या नवीन दगडी दीपमाळीच्या बांधकामाचा शुभारंभ शुक्रवारी (दि. ११) उद्योजक किरण श्रीकांत खुळे पाटील (रहाटणी, पिंपरी-चिंचवड) यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ व देवस्थानचे सेवेकरी उपस्थित होते.

पुरातन खंडोबा मंदिर परिसरात यात्रोत्सवाच्या वेळी भाविकांना दीपप्रज्वलन करता यावे, तसेच मंदिर परिसराच्या वैभवात भर पडावी, यासाठी नवीन दीपमाळ उभारण्याची सूचना ह.भ.प. प्रसाद महाराज अमळनेरकर यांनी ग्रामस्थांना केली होती. त्यानुसार ग्रामस्थांच्या लोकसहभागातून या दीपमाळीचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे.

नवीन दीपमाळ आकर्षक दगडी अष्टकोनाकृती असून तिची उंची सुमारे २१ फूट असणार आहे. दीपमाळीची रचना आणि शिल्पकाम शिल्पकार कैलास माने (चाकण) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे, अशी माहिती देवस्थानच्या वतीने प्रकाश जाधव पाटील यांनी दिली.

दीपमाळ ही महाराष्ट्रातील मंदिर वास्तुकलेतील पारंपरिक आणि वैशिष्ट्यपूर्ण रचना मानली जाते. कुलदैवत, कुलदेवता व ग्रामदैवतांच्या मंदिरांसमोर तसेच मंदिराच्या प्रांगणात दीपमाळ उभारण्याची परंपरा आहे. दीपमाळेला दीपस्तंभ किंवा दीपज्योती स्तंभ असेही म्हटले जाते.

दीपमाळ ही केवळ प्रकाशाची व्यवस्था नसून मंदिर, गाव आणि परिसराच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक मानली जाते. यात्रोत्सव तसेच धार्मिक सोहळ्यांच्या वेळी तिच्यावर प्रज्वलित होणाऱ्या दीपज्योतींमुळे मंदिर परिसराचे सौंदर्य अधिक खुलून दिसते, असे संत साहित्याचे अभ्यासक सुरेश भावे (पुणे) यांनी सांगितले.

## दुभंगलेले ओठ-टाळू असलेल्या बालकांना मोफत सर्वसमावेशक उपचार

### राष्ट्रीय आरोग्य अभियान, बजाज फायनान्स आणि 'स्माईल ट्रेन इंडिया'मध्ये तीन वर्षांचा सामंजस्य करार

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

दुभंगलेले ओठ व टाळू या जन्मजात विकाराने ग्रस्त बालकांना आता शस्त्रक्रियेसह सर्वसमावेशक उपचार मोफत मिळणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र, बजाज फायनान्स आणि 'स्माईल ट्रेन इंडिया' यांच्यात तीन वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या (ठइडघ) तपासणीत आढळलेल्या बालकांना जिल्हा नोडल अधिकाऱ्यांच्या संदर्भपत्राद्वारे 'स्माईल ट्रेन इंडिया'च्या मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये उपचारासाठी पाठविण्यात येणार आहे. जिल्हानिहाय रुग्णालयांशी समन्वय साधून उपचाराची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

बालकांना शस्त्रक्रिया, रुग्णालयातील वास्तव्य, औषधे, पोषणविषयक सेवा, दंतव्यंगोपचार आणि वाचा उपचार मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहेत. गरजेनुसार रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांच्या प्रवासाची सुविधा, भोजन आणि निवासाचा खर्चही 'स्माईल ट्रेन इंडिया'कडून करण्यात येणार आहे. शस्त्रक्रियापूर्व तपासण्या तसेच शस्त्रक्रियेनंतर उद्भवणाऱ्या गुंतागुंतीवरील उपचारांचाही खर्च या उपक्रमातून केला जाणार आहे.

बालकांची ओळख आणि उपचाराची आवश्यकता निश्चित करण्यासाठी स्माईल ट्रेनच्या भागीदार रुग्णालयांकडून आरबीएसके पथके आणि जिल्हा प्रारंभिक हस्तक्षेप केंद्रांच्या (एखउ) समन्वयाने तपासणी शिबिरे घेण्यात येणार आहेत. तसेच अशा बालकांची ओळख पटविण्यासाठी शासकीय आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण आणि मार्गदर्शन देण्यात येणार आहे.

उपचारासाठी रुग्ण पाठविणे, नोंदी ठेवणे आणि जिल्हा नोडल अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्याची जबाबदारी संबंधित मान्यताप्राप्त रुग्णालयातील प्रकल्प संचालकांकडे नोडल अधिकारी म्हणून देण्यात येणार आहे. शस्त्रक्रियेपूर्वी संबंधित रुग्णालयातील शस्त्रक्रियागृहाची सुविधा आणि भूलतज्ज्ञांची उपलब्धता यांची खातरजमा जिल्हा शल्यचिकित्सक करणार आहेत.

राज्यातील १५ रुग्णालयांत उपचार

या उपक्रमांतर्गत राज्यातील १५ मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये उपचार उपलब्ध होणार आहेत

१. आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, वर्धा
२. आनंदऋषीजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर, अहिल्यानगर
३. आस्था प्लास्टिक सर्जरी हॉस्पिटल, जळगाव
४. बेंबडे हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर
५. एलिट कॉस्मो क्लिनिक अँड प्लास्टिक सर्जरी हॉस्पिटल, सोलापूर
६. लहाने हॉस्पिटल, लातूर
७. मीरा एनएक्स हॉस्पिटल, मुंबई
८. एमआरआर चिल्ड्रन्स हॉस्पिटल, ठाणे
९. पूना हॉस्पिटल, पुणे
१०. सहयोग हॉस्पिटल, गोंदिया

# जिल्हा नियोजन समितीच्या कामांच्या वाटपावर प्रश्नचिन्ह; हवेलीतील विकासकामे समिती सदस्याच्या कुटुंबीयांना? ग्रामस्थांकडून चौकशीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

हवेली तालुक्यात जिल्हा नियोजन समितीच्या (ड्ढइउ) माध्यमातून मंजूर होणाऱ्या विकासकामांच्या वाटपावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या एका सदस्याच्या कुटुंबीयांना किंवा त्यांच्याशी संबंधित संस्थांना विकासकामे मिळाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत असून, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

सरकारी निधीतून होणाऱ्या विकासकामांच्या वाटपात संबंधित सदस्याचा थेट किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध आहे का, हा मुख्य प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. समितीच्या सदस्याच्या कुटुंबातील व्यक्तींना किंवा संबंधित संस्थांना कामे मिळाली असतील, तर त्यासाठी कोणती प्रक्रिया आणि निकष वापरण्यात आले, याची तपासणी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, प्रश्न केवळ कामांच्या वाटपापुरता मर्यादित नसून प्रत्यक्ष झालेल्या कामांच्या गुणवत्तेवरही तक्रारी करण्यात आल्या आहेत. मंजूर अंदाजपत्रकानुसार काम पूर्ण झाले आहे का, वापरण्यात आलेले साहित्य निर्धारित दर्जाचे आहे का आणि प्रत्यक्ष कामाची गुणवत्ता अपेक्षित निकषांनुसार आहे का, याची तांत्रिक तपासणी झाली का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

काही कामांमध्ये तांत्रिक मूल्यमापन आणि प्रत्यक्ष पडताळणी योग्य पद्धतीने झाली नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित कामांची स्वतंत्र तांत्रिक तपासणी करून प्रत्यक्ष खर्च, कामाची व्याप्ती आणि गुणवत्ता यांचा अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी होत आहे.

सरकारी विकासनिधीच्या वाटपामध्ये पारदर्शकता आणि हितसंबंधांचा संभाव्य संघर्ष टाळणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे समिती सदस्याशी संबंधित व्यक्ती किंवा संस्थांना कामे मिळाली असल्यास, त्या प्रक्रियेत संबंधित सदस्याची भूमिका काय होती, संबंधितांनी निविदा किंवा कामाच्या प्रक्रियेत सहभाग घेतला होता का आणि नियमांनुसार आवश्यक असलेली हितसंबंधविरहित प्रक्रिया पाळण्यात आली का, याची चौकशी होणे आवश्यक आहे.

या प्रकरणात कामे मंजूर करणारे संबंधित प्रशासकीय अधिकारी, तांत्रिक पडताळणी करणारे अधिकारी आणि कामे करणारे कंत्राटदार यांची भूमिकाही तपासण्याची मागणी होत आहे. केवळ आरोपांच्या आधारे कोणालाही दोषी ठरविण्याऐवजी कागदपत्रे, मंजुरी प्रक्रिया, अंदाजपत्रके, मोजमाप पुस्तिका आणि प्रत्यक्ष कामांची तांत्रिक पाहणी यांच्या आधारे वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची गरज व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणाची माहिती प्रशासकीय पातळीवर गोळा केली जात असल्याचे सांगण्यात येत आहे. अधिकृत तक्रार आणि प्राथमिक पुरावे प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकरणाकडून चौकशीचे आदेश दिले जाण्याची शक्यता आहे.

चौकशीत कामांच्या वाटपात नियमबाह्य प्रक्रिया, हितसंबंधांचा संघर्ष किंवा कामांच्या गुणवत्तेत अनियमितता आढळल्यास संबंधित व्यक्ती, कंत्राटदार अथवा अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई होऊ शकते. मात्र, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधितांवरील आरोपांना अंतिम निष्कर्ष मानता येणार नाही.

हवेली तालुक्यातील या प्रकरणामुळे 'विकासकामांचा निधी नेमका कोणाच्या फायद्यासाठी?' आणि 'कामांच्या वाटपापासून गुणवत्तेच्या तपासणीपर्यंत पारदर्शकता किती?' हे प्रश्न आता ऐरणीवर आले आहेत.

## सारांश वृत्त

### प्रश्नपत्रिका फुटली, विद्यार्थी कोसळला; प्रथमेशच्या मृत्यूला यंत्रणाच जबाबदार!

#### रोहित पवारांचा आरोप; एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लातूर / प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांतील कथित अनियमिततेविरोधात लातूरमध्ये शनिवारी हजारो परीक्षार्थींनी आंदोलन केले. राष्ट्रवादी काँग्रेस (शप) चे आमदार रोहित पवार यांनी या आंदोलनाला पाठिंबा देत एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी केली.

धाराशिव जिल्ह्यातील प्रथमेश देशमुख याच्या आत्महत्येचा उल्लेख करत पवार यांनी प्रश्नपत्रिका फुटल्याने निर्माण झालेल्या मानसिक तणावाला यंत्रणाच जबाबदार असल्याचा आरोप केला. अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या प्रथमेशच्या मृत्यूने परीक्षा व्यवस्थेतील गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणले आहेत.

पवार यांनी कोल्हापूरच्या सुशांत बल्लाळ या परीक्षार्थीच्या मृत्यूचाही उल्लेख करत विद्यार्थ्यांना आत्महत्येचा मार्ग न स्वीकारण्याचे आवाहन केले. हा लढा आपला आहे; पारदर्शक परीक्षांसाठी लढा सुरूच ठेवू, असे ते म्हणाले.

प्रश्नपत्रिका फुटल्याच्या तक्रारीनंतर अध्यक्षांनी भेट नाकारली आणि पेपरफुटी झाली नसल्याचा दावा केला, असा आरोप पवार यांनी केला. मात्र, नंतर गुन्हे शाखेच्या तपासात पेपरफुटी उघड झाल्याचा दावा करत अध्यक्षांना पदावर राहण्याचा नैतिक अधिकार नसल्याचे त्यांनी म्हटले.

# ब्रिक्सपूर्वी दिल्ली पोलिसांचा समाजमाध्यमांवर पहारा; प्रत्येक शब्दापासून संशयास्पद खात्यांपर्यंत नजर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / वृत्तसंस्था

ब्रिक्स परिषदेला सुरुवात होण्यापूर्वी दिल्ली पोलिसांनी समाजमाध्यमांवरील देखरेख मोठ्या प्रमाणात वाढवली आहे. सुरक्षा धोके, चुकीची माहिती, अफवा आणि कायदा-सुव्यवस्थेवर परिणाम करू शकणाऱ्या ऑनलाइन हालचाली शोधण्यासाठी पोलिसांच्या विशेष पथकांकडून चोवीस तास समाजमाध्यमांवर नजर ठेवली जात आहे.

दिल्ली पोलिसांच्या स्वतंत्र समाजमाध्यम कक्षासह गुप्तवार्ता, संमिश्र विश्लेषण आणि धोरणात्मक कारवाई विभागाकडून सार्वजनिक समाजमाध्यमांवरील संदेश, चित्रफिती आणि इतर सामग्रीचे निरीक्षण केले जात आहे. अतिरिक्त पोलिस आयुक्त संजय भाटिया यांनी सांगितले की, पोलिस समाजमाध्यमांवर बारकाईने लक्ष ठेवून असून परिषदेदरम्यान संभाव्य सायबर गैरप्रकार रोखण्यासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे.



पोलिसांची नजर केवळ एखाद्या संशयास्पद संदेशापुरती मर्यादित नसून, त्यामागील डिजिटल हालचालींचाही मागोवा घेण्यावर आहे. संशयास्पद खात्यांचा शोध, त्यांच्यातील परस्पर संबंध आणि ऑनलाइन जाळ्यांचे विश्लेषण करून संभाव्य धोके आधीच ओळखण्याचा प्रयत्न केला जात आहे.

मात्र या देखरेखीबरोबरच गोपनीयता आणि नागरिकांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. सार्वजनिक समाजमाध्यमांवरील सामग्रीवर सुरक्षा कारणांसाठी नजर ठेवणे आणि नागरिकांच्या वैध मतांवर अनावश्यक पाळत ठेवणे, यामध्ये स्पष्ट सीमारेषा असणे आवश्यक आहे.

ब्रिक्ससारख्या आंतरराष्ट्रीय परिषदेदरम्यान सुरक्षा अत्यंत महत्त्वाची असली, तरी 'सुरक्षेच्या' नावाखाली डिजिटल देखरेखीचा विस्तार किती आणि कोणत्या मर्यादेपर्यंत असावा, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे.

परिषद संपल्यानंतर या देखरेखीची पारदर्शकता आणि तिचा वापर यावरही लक्ष ठेवावे लागणार आहे.

## एचडीएफसी बँकेच्या सीईओ निवडीची प्रक्रिया सुरू; दोन नावं आरबीआयकडे, पण अंतिम निर्णयाचा अधिकार नियामकाकडे!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

भारताच्या सर्वात मोठ्या खासगी बँकांपैकी एक असलेल्या HDFC Bank मध्ये नेतृत्वबदलाची औपचारिक प्रक्रिया सुरू झाली आहे. बँकेच्या संचालक मंडळाने पुढील मुख्य कार्यकारी अधिकारी अर्थात सीईओ पदासाठी दोन उमेदवारांची नावे भारतीय रिझर्व्ह बँककडे पाठवली आहेत. मात्र या दोन्ही उमेदवारांची नावे बँकेने अद्याप जाहीर केलेली नाहीत. विद्यमान सीईओ शशिधर जगदीशन यांचा कार्यकाळ यावर्षी संपणार असल्याने उत्तराधिकारी निवडण्याची ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

शशिधर जगदीशन यांच्या नेतृत्वाखाली एचडीएफसी बँकेने देशातील खासगी बँकिंग क्षेत्रात आपले स्थान आणखी मजबूत केले. त्यामुळे त्यांच्या उत्तराधिकाऱ्याची निवड ही केवळ एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती नसून बँकेच्या पुढील धोरणात्मक दिशेचा निर्णय मानला जात आहे.

विशेष म्हणजे, या नियुक्तीत अंतिम शब्द बँकेच्या संचालक मंडळाचा नसून आरबीआयचा असतो. भारतातील खासगी क्षेत्रातील बँकांना व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ नियुक्त करण्यापूर्वी आरबीआयची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे एचडीएफसी बँकेने दोन नावे सुचवली असली तरी त्यापैकी कोणाला मंजुरी मिळणार, यावर आता नियामकाची छाननी निर्णायक ठरेल. ही प्रक्रिया अशा वेळी सुरू झाली आहे, जेव्हा भारतीय बँकिंग क्षेत्रात मोठ्या संस्थांमधील नेतृत्वाची सातत्यता, जोखीम व्यवस्थापन, कर्जवाढ आणि डिजिटल बँकिंग यांना वाढते महत्त्व आहे. एचडीएफसी बँकेसमोरही केवळ नफा वाढवण्याचे नव्हे, तर मोठ्या ग्राहकवर्गाचे व्यवस्थापन, मालमत्तेची गुणवत्ता आणि नियामक अपेक्षा यांचा समतोल राखण्याचे आव्हान आहे.

त्यामुळे पुढील सीईओ कोण असेल, यापेक्षा आरबीआय कोणत्या नेतृत्वशैलीला पसंती देते आणि एचडीएफसी बँकेची पुढची दिशा काय असेल, हे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. सध्या दोन नावे बंद पाकिटात असली तरी भारतीय बँकिंग क्षेत्राचे लक्ष मात्र आरबीआयच्या निर्णयाकडे लागले आहे.

## माजी मुख्यमंत्री हरिश रावत यांच्या तत्कालीन विशेष कार्याधिकाऱ्याच्या ठिकाणी अंमलबजावणी संचालनालयाची धाड!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

उत्तराखंडातील २०१६च्या ग्रामपंचायत विकास अधिकारी परीक्षेतील कथित गैरव्यवहाराचे प्रकरण तब्बल दहा वर्षांनंतर पुन्हा चर्चेत आले आहे. अंमलबजावणी संचालनालयाने ११ सप्टेंबर २०२६ रोजी डेहराडूनमधील अनेक ठिकाणी झडती घेतली. यामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री हरिश सिंह रावत यांचे माजी विशेष कार्याधिकारी चंदन सिंह जीना यांच्या निवासस्थानाचाही समावेश होता.

उत्तराखंड अधीनस्थ सेवा निवड आयोगाच्या २०१६च्या ग्रामपंचायत विकास अधिकारी परीक्षेतील कथित अनियमिततेच्या तपासाचा भाग म्हणून ही कारवाई करण्यात आल्याचे अंमलबजावणी संचालनालयाने सांगितले. परीक्षेतील गैरप्रकाराबरोबरच उत्तरपत्रिकांवर उमेदवारांनी दिलेल्या पर्यायांची नोंद, त्यावर आधारित प्रक्रिया, खासगी संगणक संस्थेची भूमिका आणि या संपूर्ण प्रकरणाशी संबंधित



मध्यस्थांच्या हालचालींचाही तपास केला जात आहे.

झडतीदरम्यान ३२ लाख रुपयांची बेहिशेबी रोकड, १३ सोन्याची नाणी, सुमारे २००.५ ग्रॅम वजनाच्या सात सोन्याच्या साखळ्या तसेच महागड्या ब्रँडची १२ आलिशान मनगटी घड्याळे जप्त केल्याचे अंमलबजावणी संचालनालयाने म्हटले आहे. या मालमत्तेचा कथित परीक्षेतील गैरव्यवहाराशी नेमका संबंध काय आहे, याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे.

तपास यंत्रणेने तत्कालीन उत्तराखंड अधीनस्थ सेवा निवड आयोगाचे अध्यक्ष, सचिव, परीक्षा नियंत्रक, उत्तरपत्रिकांच्या संगणकीय प्रक्रियेचे काम करणाऱ्या खासगी संगणक संस्थेच्या मालकाच्या तसेच कथित कटकारस्थानाशी संबंधित मध्यस्थांच्या ठिकाणीही झडती घेतली.

यामुळे तपासाचा आवाका केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसल्याचे स्पष्ट झाले आहे. २०१६च्या भरती परीक्षेतील कथित गैरव्यवहारामुळे सरकारी नोकरीच्या भरती प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हतेवर आधीच प्रश्न उपस्थित झाले होते. आता दशकभरानंतर मोठ्या प्रमाणावर रोकड, सोने आणि महागड्या वस्तू जप्त झाल्याने या प्रकरणाला नवा आयाम मिळाला आहे.

मात्र झडती किंवा मालमत्ता जप्त होणे म्हणजे दोष सिद्ध होणे नव्हे. जप्त केलेल्या मालमत्तेचा परीक्षेतील कथित गैरव्यवहाराशी थेट संबंध असल्याचे तपास यंत्रणेला सिद्ध करावे लागेल आणि अंतिम निर्णय न्यायालयीन प्रक्रियेतच होईल.

# ब्रिक्स परिषदेत बिहारचा सत्तू-मखाना; 'ब्रँड बिहार'ला जागतिक व्यासपीठ!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

बिहारच्या पारंपरिक खाद्यपदार्थांना आता आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नवी ओळख मिळणार आहे. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे सुरू असलेल्या ब्रिक्स परिषदेत सहभागी परदेशी पाहुणे आणि प्रतिनिधींना बिहारच्या पारंपरिक खाद्यसंस्कृतीची चव चाखण्याची संधी मिळणार आहे. यामध्ये सत्तू आणि मखाना विशेष आकर्षण ठरणार आहेत.

सत्तू हा बिहारच्या ग्रामीण आणि पारंपरिक आहाराचा महत्त्वाचा भाग आहे, तर मखाना हे राज्यातील शेतकरी आणि स्थानिक अर्थव्यवस्थेशी जोडलेले महत्त्वाचे उत्पादन आहे. या दोन्ही उत्पादनांना ब्रिक्ससारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर स्थान मिळणे म्हणजे 'ब्रँड बिहार' जागतिक पातळीवर पोहोचवण्याची



मोठी संधी मानली जात आहे.

मात्र केवळ आंतरराष्ट्रीय पाहुण्यांना पदार्थांची चव देऊन जागतिक बाजारपेठेत स्थान मिळणार नाही. सत्तू आणि मखन्याची मागणी वाढवायची असेल तर गुणवत्ता, आधुनिक प्रक्रिया, आकर्षक पॅकेजिंग, साठवणूक, निर्यात व्यवस्था आणि शेतकऱ्यांना योग्य मोबदला यावर भर द्यावा लागेल.

ब्रिक्स परिषदेत बिहारच्या स्थानिक उत्पादनांना मिळणारे हे व्यासपीठ त्यामुळे केवळ खाद्यसंस्कृतीचे प्रदर्शन नाही, तर स्थानिक उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याची आर्थिक संधी आहे. परिषद संपल्यानंतरही या प्रसिद्धीचा फायदा शेतकरी, उत्पादक आणि उद्योगांना प्रत्यक्ष मिळाला, तरच 'ब्रँड बिहार'ची ही चव खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल.

# आयआरसीटीसीचा दलालांवर डिजिटल घाव; 3 कोटींहून अधिक वापरकर्ता खाती बंद, ६.33 कोटी संशयित खात्यांवर टांगती तलवार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

रेल्वे तिकिटांच्या काळाबाजाराला आळा घालण्यासाठी भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळ अर्थात आयआरसीटीसीने मोठी कारवाई केली आहे. बनावट वापरकर्ता खाती तयार करून मोठ्या प्रमाणात तिकिटे आरक्षित करणाऱ्या दलाल आणि तिकीट विक्रेत्यांविरोधात कारवाई करताना आयआरसीटीसीने ३.०४ कोटी वापरकर्ता खाती निष्क्रिय केली आहेत.

याशिवाय संशयास्पद हालचाली आढळल्याने तब्बल ६.३३ कोटी खाती तात्पुरती स्थगित करण्यात आली आहेत. या खात्यांच्या धारकांना आपली ओळख आणि खाते खरे असल्याची पडताळणी पूर्ण करेपर्यंत रेल्वे तिकिटे आरक्षित करता येणार नाहीत. आयआरसीटीसीने ही माहिती ११ सप्टेंबर २०२६ रोजी दिली.

दलालांकडून बनावट किंवा मोठ्या प्रमाणात तयार केलेल्या खात्यांचा वापर करून आरक्षण सुरू होताच तिकिटे मोठ्या प्रमाणावर बुक केली जातात. त्यानंतर मागणी वाढल्यावर हीच तिकिटे गरजू प्रवाशांना चढ्या दराने विकली जात असल्याचे समोर आले आहे. परिणामी सर्वसामान्य प्रवाशांना अधिकृत दराने तिकीट मिळणे कठीण होते.

दरम्यान, ७ सप्टेंबर रोजी एका दिवसात २० लाखांहून अधिक प्रवाशांनी रेल्वे तिकिटे आरक्षित केली. यंदाच्या




वर्षातील एका दिवसातील हा आतापर्यंतचा सर्वाधिक भार असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे संकेतस्थळावरील मोठी गर्दी, आरक्षणाची वाढती मागणी आणि दलालांकडून होणारा गैरवापर या तिन्ही बाबी रेल्वेच्या तिकीट व्यवस्थेसमोरील मोठे आव्हान ठरत आहेत.

आयआरसीटीसीची ही कारवाई मोठी असली तरी प्रश्न एवढाच आहे की ३.०४ कोटी खाती बंद आणि ६.३३ कोटी खाती संशयित ठरवल्यानंतर खऱ्या प्रवाशांना त्रास होणार नाही याची खात्री कशी केली जाणार? बनावट खात्यांवर कारवाई आवश्यकच; मात्र खरी परीक्षा म्हणजे तिकीट व्यवस्था अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणणे. दलालांचा डिजिटल खेळ थांबवण्यासाठी केवळ खाती बंद करणे नव्हे, तर गैरप्रकार करणाऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांच्यावर कठोर कारवाई करणे हीच या मोहिमेची खरी कसोटी ठरणार आहे.

# पॅकेटवर 'धोक्याचा इशारा' कुठे आहे? अल्ट्रा-प्रोसेस्ड अन्नावर सुप्रीम कोर्टाचा एफएसएसएआयला थेट सवाल!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

आपण बाजारातून एखादे पॅकेटबंद खाद्यपदार्थ विकत घेतो, त्यावरील पोषणमूल्यांचे आकडे पाहतो आणि पुढे निघून जातो. पण त्या पॅकेटमागे आरोग्याचा किती मोठा प्रश्न दडलेला आहे, यावर आता सर्वोच्च न्यायालयानेच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अल्ट्रा-प्रोसेस्ड फूड म्हणजेच अतिप्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ आणि इतर पॅकेज्ड फूड यांना एकाच मापाने मोजणे योग्य आहे का? असा थेट सवाल सर्वोच्च न्यायालयाने भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण अर्थात एफएसएसएआयला केला आहे.

न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने ११ सप्टेंबर २०२६ रोजी एफएसएसएआयच्या फ्रंट-ऑफ-पॅक लेबलिंग अर्थात एफओपीएल व्यवस्थेबाबत तब्बल १३ विशिष्ट प्रश्न उपस्थित केले. या प्रश्नांचा केंद्रबिंदू एकच ग्राहकाला पॅकेटच्या समोरच त्या अन्नपदार्थातील आरोग्यविषयक जोखमीची स्पष्ट माहिती मिळते आहे का?

सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणामागे महत्त्वाचा मुद्दा आहे. अतिप्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ आणि तुलनेने कमी प्रक्रिया केलेले पॅकेज्ड पदार्थ पोषणाच्या दृष्टीने सारखे नसू शकतात. मग दोन्हींसाठी एकच चेतावणी-लेबलची मर्यादा ठरवली तर ग्राहकाला चुकीचा किंवा अपुरा संदेश मिळण्याची शक्यता नाही का, असा न्यायालयाचा प्रश्न आहे.

यातून एफएसएसएआयच्या विद्यमान नियामक दृष्टिकोनाची मोठी परीक्षा सुरू झाली आहे. अन्नाच्या पॅकेटवर साखर, मीठ किंवा चरबीचे प्रमाण किती आहे, एवढ्यावरच आरोग्यविषयक इशारा आधारित असावा का? की अन्न किती प्रमाणात आणि कोणत्या पद्धतीने प्रक्रिया केले गेले आहे, याचाही विचार करायला हवा? हा केवळ तांत्रिक प्रश्न नाही. भारतातील कोट्यवधी ग्राहकांच्या रोजच्या आहाराशी संबंधित हा सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे.

विशेषतः मुलांमध्ये आणि तरुणांमध्ये पॅकेज्ड स्नॅक्स, गोड पेये, तयार खाद्यपदार्थ आणि इतर अतिप्रक्रिया केलेल्या पदार्थांचा वापर वाढत असताना लेबलिंग व्यवस्था किती परिणामकारक आहे, हा प्रश्न अधिक गंभीर ठरतो. आकर्षक पॅकेजिंग, जाहिराती आणि आरोग्यदायी असल्याचा भास निर्माण करणारे दावे यांच्या तुलनेत पॅकेटच्या पुढील बाजूवर स्पष्ट आणि सहज समजणारी माहिती नसेल, तर ग्राहकाचा 'माहितीच्या आधारे निवड करण्याचा अधिकार' कितपत प्रत्यक्षात येतो?

याच ठिकाणी न्यायालयाचा हस्तक्षेप महत्त्वाचा ठरतो. नियम बनवणे आणि ते ग्राहकाच्या आरोग्याचे प्रभावी संरक्षण करतील अशी रचना करणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. एफएसएसएआयने केवळ उद्योगासाठी सोयीची आणि कागदावर पूर्ण दिसणारी व्यवस्था उभी करण्याऐवजी ग्राहकाला प्रत्यक्षात उपयोगी पडणारी प्रणाली तयार केली आहे का, याचे उत्तर द्यावे लागणार आहे.

या सुनावणीमुळे सरकार आणि अन्न नियामकांसमोर मूलभूत प्रश्न उभा राहतोपॅकेटवरील माहिती उद्योगाला कायदेशीर संरक्षण देण्यासाठी आहे की ग्राहकाला आरोग्यदायी निर्णय घेण्यास सक्षम करण्यासाठी?

सर्वोच्च न्यायालयाने विचारलेले १३ प्रश्न त्यामुळे केवळ लेबलिंगच्या तांत्रिक नियमांपुरते मर्यादित नाहीत. ते भारतातील अन्न-नियमन व्यवस्थेची दिशा तपासत आहेत. ग्राहकाच्या हातात पॅकेट असते; पण त्यावरची माहिती किती पारदर्शक, वैज्ञानिक आणि समजण्यासारखी आहे, यावर त्याचा निर्णय अवलंबून असतो.

'पॅकेज्ड' हा शब्द वापरून सगळ्या अन्नपदार्थांना एकाच चौकटीत बसवणे सोपे असू शकते; पण सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने ते पुरेसे आहे का, हा प्रश्न आता सर्वोच्च न्यायालयाने एफएसएसएआयसमोर ठेवला आहे.